# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/12/2023 (शुक्रवार) सकाळ

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण २०,३०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन भिवापूरची कारवाई

दिनांक १४/१२/२०२३ रोजी २०.०० वा. ते २२.०० वा. पावेतो पो.स्टे. भिवापुर अंतर्गत भिवापुर पो.स्टे. टी पॉईन्ट येथे अचानक राबविलेल्या नाकाबंदी दरम्यान निलज फाटयाकडुन भिवापुरकडे टिप्पर ट्रक क्र. MH-40/BL-9565 येतांना दिसला त्यास थांबवुन तपासले असता सदर ट्रकमध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती आढळुन आली. ट्रकमध्ये असलेल्या रेतीचे रॉयल्टीबाबत ट्रक चालकास विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदर ट्रकमधिल रेती ही चोरीची असल्याचे दिसुन आल्याने सदर टिप्पर चालक व **आरोपी नामे— मोजेश कृष्णाजी मेश्राम, वय ४२ वर्ष, रा. पिटेसुर गोधनी ता. जि. नागपूर** यांचे ताब्यातून टिप्पर ट्रक क्रं. MH-40/BL-9565 किंमती २०,००,०००/— रू. व त्यामधील ०६ ब्रास रेती किंमती अंदाजे ३०,०००/—रू. असा एकुण २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल अवैध्यरीत्या विनापरवाना चोरून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने मुद्देमाल जप्त करून पोलीस ठाणे भिवापूर येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. सहकलम ४८(८) महा. जमिन महसुल अधिनियम १९६६ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आलेला असुन पुढील तपास पोलीस हवालदार प्रविण जाधव मो. नं. ९६८९९२५९२४ हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर